मुंबईत निम्म्याहून अधिक रुग्ण 'कोरोना मुक्त'

३२ हजारांपैकी १७ हजार जण बरे; मृत्युदर आता ३.२ टक्क्यांवर

मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी) : मुंबईत रुग्णसंख्या ३२ हजारांवर गेली असली तरी यातील ८ हजार, ४०० जणांनी कोरोनावर मात केली आहे. या सर्वांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. नऊ हजार जणांना कोणतीही लक्षणे नसल्यामुळे घरीच 'क्वारंटाईन' करण्यात आले आहे. त्यामुळे मुंबईत एकूण रुग्णांपैकी निम्म्याहून जास्त म्हणजेच १७ हजार रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. एप्रिलमध्ये असणारा ७.६ मृत्युदर आता ३.२ पर्यंत खाली आला आहे, अशी माहिती पालिका आयुक्त इकबालसिंग चहल पत्रकार परिषदेत दिली. पालिका आयुक्त इकबालसिंग चहल यांनी राज्याचे मुख्य सचिव अजोय मेहता यांच्यासह ऑनलाईन पत्रकार परिषद घेऊन मुंबईतील कोरोनाच्या स्थितीची माहिती दिली. मुंबईत आता १५ हजार ८०० रुग्णांमध्ये कोरोनाची लक्षणे नसल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय समितीच्या अहवालानुसार ३१ मेपर्यंत मुंबईत ४० हजार रुग्ण होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला होता. मात्र, कोरोनामुक्त होणाऱ्या रुग्णांची संख्या पाहता मुंबईत ३१ मेपर्यंत कोरोना रुग्णांचा आकडा २६ ते २७ हजारांपर्यंत नियंत्रित राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

६०० डायलिसिसमुळे मृत्यू घटणार

डायलिसिस रुग्णांची सोय होण्यासाठी ६०० डायलिसिसची सुविधा सुरू करण्यात आली आहे. दोन दिवसांत ३० रुग्णांवर डायलिसिस करण्यात आले आहे. डायलिसिसच्या सुविधेमुळे मृत्यू घटतील असा विश्वासही पालिका आयुक्तांनी व्यक्त केला.

बेड कमी पडणार नाहीत

मुंबईत सध्या ७५ हजार बेड तैनात आहेत. शिवाय रुग्णवाढ होत असली तरी दररोज शेकडो रुग्ण बरे होऊन जात असल्यामुळे खाटा उपलब्ध होत आहेत. बीकेसी, गोरेगाव, वरळी डोम, महालक्ष्मी रेसकोर्स अशा ठिकाणी मोठ्या संख्येने बेड्स उपलब्ध होत आहेत. याशिवाय मोठ्या ३३ खासगी रुग्णालयांतील ८० टक्के नियमित खाटा आणि १०० टक्के आयसीयू बेड्सही आता पालिकेच्या ताब्यात आले आहेत. १५ जूनपर्यंत बेड्सची क्षमता एक लाखांवर जाणार आहे, तर पुढील काही दिवसांत ही क्षमता १ लाख, १५ हजारांवर नेण्याचे नियोजन आहे. त्यामुळे बेडची कमतरता पडणार नाही, असा विश्वासही चहल यांनी व्यक्त केला.

पालिकेचे आता 'व्हायरस चेसिंग', एका रुग्णामागे १५ जण 'क्वारंटाईन'

कोरोना रुग्ण आढळल्यानंतर आता 'कॉन्टॅक्ट ट्रेसिंग' आणखी प्रभावी करण्यात येणार आहे. यामध्ये कोरोना व्हायरस आपल्या मागे येणार नाही, तर आपण त्याला शोधून काढणार आहोत यासाठी 'व्हायरस चेसिंग' ही मोहीम राबवण्यात येणार आहे. यामध्ये एका रुग्णामागे सध्या पाच ते सहा जणांना 'क्वारंटाईन' करण्याचे प्रमाण १५ म्हणजेच तिप्पट करण्यात येणार आहे. कोरोना रुग्णाच्या कॉन्टॅक्टमधील या १५ जणांना सक्तीने आणि प्रभावीपणे 'क्वारंटाईन' करण्यात येणार असल्याची माहितीही पालिका आयुक्त इकबालसिंग चहल यांनी दिली.

बोरिवली-दहिसरमध्ये आता सुसज्ज 'कोविड केअर केंद्र'

मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी): राज्यात आणि विशेषत: मुंबईत दिवसेंदिवस कोरोना रुग्णांची संख्या वाढत असून त्याच्या प्रतिबंधासाठी प्रशासन शक्य असेल तेथे कोअर केंद्र उभारत आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) आता दहिसर चेक नाका तसेच बोरिवली कांदरपाडा येथे 'कोविड केअर सेंटर' उभारण्यात येत आहे.

पश्चिम उपनगरांतील कोरोनाची लागण झालेल्याची रुग्णांची वाढती संख्या पाहता 'या ठिकाणी कोविड कक्ष उभारण्याची मागणी म्हाडा सभापती विनोद घोसाळकर यांनी केली होती. दहिसर जकात नाका येथे ८५० ऑक्सिजनयुक्त बेडची व्यवस्था असणार आहे.' तर बोरिवली आरटीओ कार्यालयाजवळील कांदरपाडा येथे डायलिसिस सुविधा असणारी २०० बेडचे अतिदक्षता विभागांचे एक अलगीकरण केंद्र बांधण्यात येणार आहे. दहिसर जकात नाका येथील जागा रिकामी होती. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी या जागेची पाहणी करून युद्धपातळीवर काम सुरू केले आहे. याबाबत एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी सुरू झालेले हे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले असून येत्या दोन आठवड्यात ते पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान राज्य सरकारने विविध विभागांना शहरातील आरोग्यविषयक पायाभूत सुविधा उभारण्यासाठी विलगीकरण आणि अलगीकरण केंद्र निर्माण करण्यास सांगितले आहे. अलीकडेच, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मैदानात गंभीर नसलेल्या रुग्णांसाठी १ हजार २३ बेडचे रुग्णालय उभारले आहे.

'कोरोना' रुग्णांचे 'डायलिसिस'ही होणार वेळेत

मुंबई महापालिका प्रशासनाकडून एकूण ९० मशीनची व्यवस्था

मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी) : डायलिसिसची आवश्यकता असलेल्या कोरोना रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून महापालिकेने ९० डायलिसिस मशीनची व्यवस्था केली आहे. त्यामुळे कोरोना रुग्णांचे आता डायलिसिसही वेळेवर होणार आहे.

डायलिसिसची आवश्यकता असलेल्या कोरोना रुग्णांचे वेळेत डायलिसिस होत नसल्यामुळे मृत्युदर वाढला होता. मात्र, पालिकेने ९० डायलिसिस मशीनची व्यवस्था केल्याने दररोज ६०० कोरोना रुग्णांचे, तर १०० संशयित रुग्णांचे डायलिसिस करणे शक्य होणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर व उपनगरात सर्व डायलिसिस सेंटरसाठी काही नियम पालिकेने तत्काळ लागू केले आहेत. ज्या व्यक्तींना नियमित डायलिसिसची गरज असते तसेच ज्यांना कोरोनाची बाधा झाल्याचे आढळून येईल, त्यांच्यासाठी रुग्णालयांचा काही भाग पूर्णपणे वेगळा असेल, अशा पद्धतीची व्यवस्था तत्काळ

सुरू करण्याचे निर्देश काही दिवसापूर्वी मुंबई पालिका प्रशासनाने दिले होते. त्यानुसार कस्तुरबा, केईएम, सेव्हन हिल्स, सैफी व नानावटी या पाच रुग्णालयांत डायलिसिसची व्यवस्था करण्यात आली आहे.

कोरोनावरील उपचारासाठी जे रुग्ण अन्य रुग्णालयात दाखल आहेत व त्यांना डायलिसिसची आवश्यकता असल्यास डायलिसिस करण्यापुरते या पाच रुग्णांमध्ये पाठविता येते. मात्र, डायलिसिस मशीनची कमतरता भासू लागल्यामुळे मृत्युदरात वाढ झाली आहे. डायलिसिस झाले नाही म्हणून कोरोना रुग्णाचा मृत्यू झाला, असे होऊ नये म्हणून पालिकेने ९० डायलिसिस मशीनची व्यवस्था केली आहे. या यंत्रणेद्वारे आतापर्यंत ३० रुग्णांचे डायलिसिस करण्यात आल्याचे पालिका आयुक्तांनी सांगितले.

पोर्टलवर माहिती

कोरोना 'पॉझिटिव्ह' रुग्णांसाठी ८४ आणि कोरोना संशयित रुग्णांसाठी सहा मशीनची सोय करण्यात आली असून कुठल्या रुग्णालयात कधी डायलिसिस करता येईल, मशीन केव्हा उपलब्ध होईल, यासंबंधीची माहिती रिअल टाइम ऑनलाईन पोर्टल www.coviddialysis.in वर मिळेल, असे पालिकेने स्पष्ट केले आहे.

थोडक्यात

ज्येष्ठ कलावंतांच्या आश्रमासाठी विक्रम गोखले यांच्याकडून जमीन दान

मुंबई : निराधार असलेल्या ज्येष्ठ कलाकारांची राहण्याची सोय व्हावी, याकरिता वृद्धाश्रम बांधण्यासाठी ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांनी पुण्याजवळील नाणेगाव येथील एक एकर जागा अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाकडे सुपूर्द करत असल्याची घोषणा केली. विक्रम गोखले यांचे वडील चंद्रकांत गोखले यांच्या दानशूर वृत्तीचा वारसा विक्रम गोखले यांनीही पुढे चालवला आहे. चंद्रकांत गोखले दरवर्षी देशाप्रति आपली कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता आपल्या कमाईतील काही भाग नित्यनेमाने भारतीय सैन्यदलाला मदत म्हणून देत असत. त्यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव विक्रम गोखले यांनी त्यांचा हा स्तुत्य वारसा पुढे चालू ठेवला असून दरवर्षी त्यांनीही हे मदतकार्य चालूच ठेवले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वच कलाकारांप्रमाणे विक्रम गोखले यांनी स्वतः मदत तर केली आहेच, परंतु बॉलिवूडमधील इतर कलावंतानाही हक्काने मराठी चित्रपटसृष्टीतील आपल्या सहकलाकारांना मदत करण्याचे आवाहन केले आहे. विक्रमजींनी ज्येष्ठ कलावंतांची नेहमी होणारी फरफट पाहिली आहे. त्यासाठी उपाय शोधावा अशी त्यांची कायमच भावना होती. आपली मनीषा पूर्ण करण्यासाठी त्यांनी यावेळी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाकडे नाणेगावातील पौड जवळील स्वतःच्या मालकीचा एक एकराचा प्लॉट महामंडळाच्या नावाने करून द्यायचा ठरवला आहे. आज त्याची बाजारभावानुसार किंमत अडीच कोटी रुपये आहे. या ठिकाणी महामंडळाने ज्येष्ठ व एकटे राहणाऱ्या कलावंतांना आसरा आणि सहारा मिळावा मोफत राहण्याची सोय करावी यासाठी सदर जागा विक्रम गोखले अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाला दान केली आहे. लवकरच ही जागा महामंडळाच्या नावे करून देण्याची त्यांनी घोषणा केली आहे. अखिल भारतीय मराठी चित्रपटाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी विक्रम गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली हा आश्रम उभा करण्याचे ठरवले असून त्यांनी विक्रम गोखले यांचे आभार मानले आहेत.

हातावर पोट असणाऱ्यांच्या मदतीसाठी 'बिग-बी' सरसावले!

मुंबई : 'लॉकडाऊन' काळात विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या मजूर-कामगारांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. सर्वसामान्य रोजंदारीवर काम करणारे कामगार, मजूर यांचे खाण्याचे हाल होऊ लागले आहेत. अशा कठीण प्रसंगी महानायक अमिताभ बच्चन यांनी मदतीचा हात पुढे केला आहे. अमिताभ बच्चन यांच्यावतीने 'एबी कॉर्प लिमिटेड'चे व्यवस्थापकीय संचालक राजेश यादव गरजूंना मदत करत आहेत. त्यांनी हाजी आली ट्रस्ट आणि पीर मखदूम साहेब ट्रस्टच्या मदतीने दररोज शिजवलेल्या अन्नाच्या पॅकेटचे वाटप देखील सुरू केले आहे. अमिताभ बच्चन यांच्या या संस्थेने अरब गली, ऑन्टॉप हिल, वरळी लोटस, माहीम दर्गा, हाजी अली दर्गा, धारावी आणि सायन या भागात ही अन्न वाटप सेवा सुरु केली आहे. दरम्यान, अमिताभ बच्चन यांनी प्रसारमाध्यमांना या कामाची खबर लागू नये म्हणून याचा कुठेही गाजावाजा केला नाही. याच बरोबर त्यांनी पायी जाणाऱ्या मजुरांच्या प्रवासासाठीदेखील मदत केल्याचे सांगितले जाते आहे.

मुंबईतील पाच 'वॉर्ड' 'कोरोना'चे 'हॉटस्पॉट'

प्रत्येक ठिकाणी दोन हजारांहून अधिक रुग्ण

मुंबई, दि. २७(प्रतिनिधी): राज्यात आढळणाऱ्या कोरोनाबाधितांमध्ये सर्वाधिक रुग्ण मुंबईत आणि सर्वाधिक मृत्यूही मुंबईत आहेत. त्यातही मुंबईतील पाच वॉर्ड कोरोनाचे 'हॉटस्पॉट' ठरले आहेत. तेथे दोन हजारांहून अधिक रुग्ण सापडले आहेत.

देशात आढळणाऱ्या कोरोनाबाधितांमध्ये महाराष्ट्रात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव सर्वात जास्त आहे. त्यातही मुंबईत सर्वाधिक आहे. कोरोनाला रोखण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. तरीही दिवसागणिक कोरोना बाधित रुग्णांची संख्या वाढतच आहे.

मुंबईत रुग्णांची संख्या ३२,७९१ झाली आहे, तर १,०६५ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यातही महापालिकेच्या पाच वॉर्डमधील कोरोना रुग्णसंख्या दोन हजारांहून



अधिक आहे.

वरळी पाठोपाठ दादर, माहीम व धारावी हे 'जी उत्तर' प्रभागातील परिसर कोरोनाचे 'हॉटस्पॉट' ठरत आहेत. या विभागातील धारावी, दादर, माहीममध्ये रोज रुग्णसंख्या वाढत आहे. धारावीत एकूण रुग्णांची संख्या १,६२१ वर पोहोचली आहे. रुग्णसंख्या २४५ वर पोहोचली आहे. माहीममध्ये एकूण कोरोना रुग्णसंख्या ३७५ वर पोहोचली आहे. चेंबूर, गोवंडी, हे भागही कोरोनाचे केंद्रबिंदू ठरत आहेत. दिवसेंदिवस वाढत असलेल्या कोरोना 'पॉझिटिव्ह' रुग्ण संख्येमुळे पालिका आरोग्य विभागावरील ताण वाढू लागला आहे.

दोन हजारांपेक्षा अधिक रुग्णसंख्या असलेले भाग		
१	जी उत्तर	२,५९८
२	ई	२,३३१
३	एफ उत्तर	२,२९२
४	एल	२,१९७
५	एच पूर्व	२,००६
दोन हजारांपेक्षा कमी रुग्ण असलेले भाग		
६	के पश्चिम	१,९६८
७	जी दक्षिण	१,८११
८	के पूर्व	१,७४१
९	एम पूर्व	१,६२०
१०	एफ दक्षिण	१,५३०
११	एफ उत्तर	१,१५५

मुंबईत बुधवारी सापडले १,०४४ रुग्ण

मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी) : कोरोनाचा प्रतिबंध करण्यात आरोग्य यंत्रणेला यश आल्याचे दिसत आहे. आज दिवसभरात १,०४४ रुग्ण सापडले असले तरी मागील आठवड्यात सापडलेल्या रुग्णांच्या मानाने कमी आहेत. मागील आठवड्यात दररोज दीड हजारांहून अधिक रुग्ण आढळत होते. मंगळवारी १००२ रुग्ण सापडले होते, तर बुधवारी १,०४४ रुग्ण सापडले. त्यामुळे कोरोनाबाधितांची एकूण संख्या ३३,८३५ झाली आहे. आज २४० रुग्ण बरे झाले असून त्यांची एकूण संख्या ९०५४ झाली आहे, तर आज ३२ जणांचा मृत्यू झाला असून मृतांची संख्याही १,०९७ झाली आहे. कोरोनाचा 'हॉटस्पॉट' ठरलेल्या धारावीत सातत्याने दोन दिवस रुग्णसंख्या घटली आहे. मंगळवारी ३८ रुग्ण सापडले होते, तर बुधवारी १८ रुग्ण सापडले आहेत. गेले अनेक आठवडे ५० ते ९० या दरम्यान रुग्ण सापडत होते. गेले दोन दिवस कमी संख्येने रुग्ण सापडत असल्याने धारावीत कोरोनाला आळा बसत असल्याचे जाणवत आहे. धारावीत दिवसभरात १८ रुग्ण सापडल्याने एकूण रुग्णसंख्या १६३९ वर पोहोचली आहे. आज एकाचा मृत्यू झाला असून एकूण मृत्यूंची संख्याही ६१ पर्यंत पोहोचली आहे.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटिसाद्वारे कळविण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. विजय दत्तात्रय सोनजे व सौ. विदया विजय सोनजे हे खालील वर्णनाची मिळकतीचे मालक श्री. लक्ष्मण भवरलाल कटारिया व सौ. सोनल लक्ष्मण कटारिया यांच्याकडून खालील मिळकत विकत घेत आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे कोहोजखुटंवली अंबरनाथ (पूर्व) तालुका अंबरनाथ जिल्हा ठाणे येथिल प्लॉट नं २ सिटी सर्व्हे नं.४८३९ ते ४८४३, ७११० ते ७११६, ७११८ ते ७१२२, ७१२४ ते ७१३३ यावरील शिवधाम कॉम्प्लेक्स मधील त्रिनेत्र को-ऑप हौसिंग सोसायटी लि. मधील 'ए' विंग मधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका नं-३०१ क्षेत्र ५८० चौ.फूट बांधित म्यु.घ.नं. ७, घ.न. ११४० नविन म्यु. घर क्र. ०७०१०१२५४४ अंबरनाथ नगरपालिकेच्या हद्दीतील.

अशा वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्री बाबत कुणाला हरकत असेल तर हि नोटिस मिळाल्या पासून ७ दिवसांच्या आत माझ्या ऑफिसच्या पत्यावर कागदपत्रासहित हरकत नोंदवावी. अन्यथा सदरील विक्रीबाबत कुणास हरकत नाही असे समजून विक्री करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पत्ता : शॉप नं. ४६, परांजपे शॉपिंग कॉम्प्लेक्स,
दुसरा मजला, प्रॉमिंट कोचिंग क्लासजवळ,
अंबरनाथ (प.) जि. ठाणे. मोबा. ९७६७४१४१४६

सही/-
ॲड. वसंत प्र. कटारनवरे

मध्य रेल्वे

ओएचई फाऊंडेशन कामे

खुली ई-निविदा सूचना क्र. BB.LD.583.P. Rev.19/11.Cont/R2 दिनांकित २६.०५.२०२०. कामाचे नाव: मुंबई विभागाच्या कुर्ला जिल्ह्यामध्ये ओएचई फाऊंडेशनचे कास्टिंग, मास्ट उभारणी, इतर ओएचई कामे आणि केबल टाकण्याच्या कामाकरिता **निविदा क्र. BB.LD.583.P.Rev.19/11.Cont/R2. अंदाजित किंमत:** ४५७०६६४.५०. **ईएमडी रु. :** ९१४००/-. **निविदा अर्जाची किंमत रु.:** ३,०००/-. **पूर्तता कालावधी:** १२ महिने. **प्रस्तावाची वैधता:** ४५ दिवस. **I) उपरोल्लेखित निविदेसाठी निविदा बंद होण्याचा दिनांक आणि वेळ दि. १७.०६.२०२० रोजी ११.०० वाजेपर्यंत आणि ११.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील. II)** संभाव निविदाकारांना विनंती करण्यात येते की त्यांनी निविदेचा तपशील आणि शुद्धीपत्रक, जर असल्यास, करिता **www.ireps.gov.in** या वेबसाईटला भेट द्यावी. **III)** निविदा वरील ई-निविदेमध्ये फक्त वेबसाईट **www.ireps.gov.in** वेबसाईटद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने भाग घेऊ शकतो आणि ई-निविदेऐवजी प्रस्ताव स्वहस्ते सादर करता येणार नाहीत. जर प्रस्ताव स्वहस्ते सादर केल्यास उघडण्यात अथवा विचारात घेण्यात येणार नाहीत. **IV)** निविदा प्रपत्र किंमत आणि ईएमडी फक्त नेट बँकिंग किंवा पेमेन्ट गेटवे द्वारेच स्वीकारली जाईल. **V)** अधिक चौकशीकरिता, वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (ट्रॅक्शन डिस्ट्रीब्युशन), मुंबई विभाग, मध्य रेल्वे विस्तारित इमारत, २ रा मजला, मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ४००००१ यांना दूरध्वनी क्र. ०२२-२२६१२३५५ या क्रमांकावर संपर्क साधावा. निविदेचा संपूर्ण तपशील वेबसाईट **www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहे. निविदेचा संपूर्ण तपशील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (ट्रॅक्शन डिस्ट्रीब्यूशन), मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-४००००१ यांच्या "सूचना फलकावर" देखील उपलब्ध आहे. **92**

आरपीएफ सुरक्षा हेल्पलाईन-१८२

'बीपीटी' आणि 'आयमॅक्स'च्या जागांची किशोरी पेडणेकर यांच्याकडून पाहणी

मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी): कोरोनाचा सामना करतानाच पावसाळ्यात उद्भवणाऱ्या आजारांवर उपचार करण्यासाठीही जागा उपलब्ध असाव्यात, यासाठी महापौर किशोरी पेडणेकर यांनी बीपीटी आणि आयमॅक्स सिनेमागृहाच्या जागांची पाहणी केली.

आगामी पावसाळ्याच्या दिवसात संसर्गजन्य आजारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता, भविष्यातील नियोजनाच्या दृष्टिकोनातून जागेची मोठ्या प्रमाणात उपलब्धता असावी, या दृष्टीने ही पाहणी करण्यात आली आहे.

'एफ/दक्षिण' विभागातील मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेसह, आयमॅक्स चित्रपटगृह , कोलगेट कंपनी, कॉटन वेअरहाऊस या सर्व ठिकाणांच्या मोकळ्या व बंदिस्त जागेमध्ये आपत्कालीन परिस्थितीत कशाप्रकारे नियोजन करता येईल, याची चर्चा करण्यात आली असल्याचे महापौरांनी सांगितले. मुंबईकर नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने त्यांना जास्तीत जास्त सुविधा मिळाव्यात यासाठी हे सर्व नियोजन करण्यात येत असल्याचे महापौर म्हणाल्या. तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर, मोठ्या संख्येने कम्युनिटी किचनसाठी जागा उपलब्ध होऊ शकते का, याबाबतसुद्धा पाहणी करण्यात आली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी आरोग्य समिती अध्यक्ष अमेय घोले, नगरसेवक मंगेश सातमकर, सचिन पडवळ, रामदास कांबळे, 'एफ/दक्षिण' विभागाच्या साहाय्यक आयुक्त स्वप्नजा क्षीरसागर उपस्थित होत्या.

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E- TENDER NOTICE (Extension)

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for following works

RFX No.	E-Tender No. & Description of Material	Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender
7000016120	**EE/EHV/O&M/DN/KLW/ TENDER-13/2020-21** Tender for Providing services of semiskilled labours (PWD license holder persons) at various Substations and 400KV Line S/Dn., Kalwa under EHV (O&M) Dn., Kalwa. **Estimated Cost: Rs. 84,22,427.52/-**	Tender Downloading Dates & time. Tender Sale period. From Dt. 28.05.2020, 15:00 Hrs To Dt. 05.06.2020, 10:00 Hrs. **Technical Opening:** Dt. 05.06.2020 at 11:00 hrs (Onwards if possible) **Commercial Opening:** Dt. 05.06.2020 at 14:00 hrs (Onwards if possible)
	Tender Fee	**Rs. 500 + GST**

Contact Person: The Executive Engineer - 9769006237,
For further details visit our Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in**
Note: All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) **https://srmetender.mahatransco.in.**

sd/-
Executive Engineer, EHV (O&M) Dn., Kalwa

विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड

सीआयएन:एल24100एमएच1986पीएलसी039837

नोंदणीकृत कार्यालय: रिजन्ट चेंबर्स, 7वा मजला, जमनालाल बजाज मार्ग, 208, नरिमन पॉईंट, मुंबई - 400 021. **दूरध्वनी:** 91 22 2282 2708; **फॅक्स:** 91 22 2204 3969
ई-मेल: cs.vinylchemicals@pidilite.com; **वेबसाइट:** www.vinylchemicals.com

सूचना

गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी प्राधिकरणाकडे इक्विटी शेअर्सचे हस्तांतरण

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनी अधिनियम, 2013 (अधिनियम) चे कलम 124 च्या तरतुदी तसेच गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी प्राधिकरण (लेखांकन, लेखापरीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम, 2016 (नियम), सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे, यांच्या अनुरोधाने, कंपनीचे इक्विटी शेअर्स, ज्यांच्या संबंधात वित्तीय वर्ष 2012-13 दरम्यान लाभांश घोषित करण्यात आला होता, ज्यासाठी सलग सात वर्षांकरिता किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीकरिता लाभांशावर दावा करण्यात आलेला नाही किंवा लाभांश प्रदान करण्यात आलेला नाही, ते शेअर्स कंपनीकडून गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी प्राधिकरणाच्या (आयईपीएफ प्राधिकरणाच्या) डिमॅट खात्यामध्ये हस्तांतरीत करणे आवश्यक आहे.

भारतातील कोव्हिड-19 महामारीचा उद्रेक लक्षात घेता, ज्यांचे शेअर्स आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यासाठी पात्र आहेत त्या संबंधित भागधारकांच्या नोंदणीकृत पत्त्यांवर त्यांना व्यक्तिशः सूचनेस पाठवणे कंपनीला शक्य झाले नाही आणि आयईपीएफ प्राधिकरणाकडे शेअर्सचे हस्तांतरण टाळण्यासाठी, उशिरात उशिरा म्हणजे **19 ऑगस्ट 2020** पर्यंत, त्यांच्या दावा न करण्यात आल्यावर लाभांशावर दावा करण्याचा सल्ला कंपनीकडून देण्यात येत आहे. परिस्थिती पूर्वपदावर आल्यावर, कंपनी पुर्वोक्त भागधारकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर, इतर गोष्टींबरोबर, नोटिसा पाठवेल, दावा न करण्यात आलेल्या लाभांशांचा तपशील प्रदान करेल आणि आयईपीएफ प्राधिकरणाकडे त्यांच्या शेअर्सचे हस्तांतरण टाळण्यासाठी दावा करण्यात न आलेल्या लाभांशावर उशिरात उशिरा म्हणजे **19 ऑगस्ट 2020** पर्यंत दावा करण्याची संधी प्रदान करेल.

वरीलच्या संबंधात, मेसर्स टीएसआर दाराशॉ कन्सल्टन्टस प्रा. लि., कंपनीचे रजिस्ट्रार ॲन्ड ट्रान्सफर (आर ॲंड टी) एजन्ट्स यांनी, ज्यांचे ईमेल ॲड्रेसेस उपलब्ध नाहीत त्या संबंधित भागधारकांच्या लाभासाठी कंपनी आपल्या वेबसाइटवर ही जाहिरात आणि संबंधित भागधारकांनी आवश्यक ती कृती करण्यासाठी पुर्वोक्त नियमांच्या अंतर्गत आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यासाठी पात्र असणाऱ्या शेअर्सचा तपशील अपलोडदेखील करेल.

ज्या भागधारकांचे शेअर्स हे आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यासाठी पात्र आहेत त्या संबंधित भागधारकांचा तपशील कंपनीने आपल्या वेबसाइटवर अपलोडही केलेला आहे. आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यासाठी पात्र असणाऱ्या अशा दावा न करण्यात आलेल्या लाभांशांच्या, जर असल्यास, आणि संबंधित शेअर्सच्या तपशीलाची पडताळणी करण्यासाठी भागधारकांना कंपनीच्या वेबसाइटचा संदर्भ घेण्याची विनंती करण्यात येत आहे.

वित्तीय वर्ष 2012-13 आणि त्यापुढील कालावधीदरम्यान घोषित करण्यात आलेल्या लाभांशावर, आयईपीएफमध्ये हस्तांतरीत करण्यात येण्यापूर्वी ज्यांच्यावर दावा करण्यात आला नव्हता किंवा ते प्रदान करण्यात आले नव्हते, दावा करण्याची भागधारकांना विनंती करण्यात येते.

वास्तविक स्वरूपात भागधारणा करणारे आणि ज्यांचे शेअर्स हे आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यासाठी पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांनी नोंद घ्यावी की त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ शेअस सर्टिफिकेट (सर्टिफिकेट्स) हे रद्द होईल आणि वाटाघाटीयोग्य नसल्याचे (नॉन-नेगोशिएबल) मानण्यात येईल आणि त्याऐवजी नवीन सर्टिफिकेट्स जारी करण्यात येतील आणि नंतर आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात येतील/पाठवण्यात येतील. शेअर्स डीमॅट स्वरूपात धारण केल्यास, हस्तांतरीत करण्यासाठी पात्र असलेले संबंधित शेअर्स हे भागधारकाच्या डीमॅट खात्यामधून वजा करण्यात येतील आणि कॉरपोरेट कृतीद्वारे आयईपीएफ प्राधिकरणाच्या डीमॅट खात्यामध्ये हस्तांतरीत करण्यात येतील.

संबंधित भागधारकांनी त्यांच्या दावा न केलेल्या लाभांशांवर 19 ऑगस्ट 2020 पर्यंत दावा न करण्याच्या बाबतीत, कंपनी ही नियमांचे पालन करणे ध्यानात ठेवून, भागधारकांना कोणतीही पुढील नोटीस न देता आयईपीएफ प्राधिकरणाकडे शेअर्स हस्तांतरीत करेल आणि अशा हस्तांतरीत करण्यात आलेल्या शेअर्सच्या संबंधात कंपनीविरोधात कोणताही दावा स्वीकारण्यात येणार नाही.

भागधारकांनी याची नोंद घ्यावी की आयईपीएफ प्राधिकरणाकडे शेअर्स हस्तांतरीत करण्यात आल्यावर, यामध्ये अशा शेअर्सवर उपार्जित होणारे सर्व लाभ समाविष्ट, पुर्वोक्त नियमांतर्गत विहित करण्यात आल्याप्रमाणे, आयईपीएफ प्राधिकरणाकडे फॉर्म आयईपीएफ-5 मधील ऑनलाईन अर्ज करून केवळ आयईपीएफ प्राधिकरणाकडे सदरकरिता दावा करण्यात येऊ शकतो आणि आयईपीएफ/वेबसाइटवर म्हणजेच www.iepf.gov.in वर सदर फॉर्म उपलब्ध आहे.

वरील विषयाच्या बाबत कोणत्याही शंकांसाठी, भागधारक हे मेसर्स टीएसआर दाराशॉ कन्सल्टन्ट्स प्रा. लि. कंपनीचे आर ॲंड टी एजन्ट्स, 6-10, हाजी मुसा पत्रावाला इंडस्ट्रियल इस्टेट, 20, डॉ. ई. मोजेस रोड, फेमस स्टुडिओजवळ, महालक्ष्मी-मुंबई 400 011 यांच्याशी संपर्क साधू शकतील; ईमेल: csg-unit@tsrdarashaw.com; वेबसाइट: www.tsrdarashaw.com किंवा कंपनीला cs.vinylchemicals@pidilite.com या ई-मेल ॲड्रेसवर संपर्क साधू शकतील.

विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेडसाठी
पी. सी. पटेल
सचिव

स्थळ : मुंबई
दिनांक : 28/05/2020